*Review Of Research*
Vol. 2 | Issue. 11 | August 2013
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

**ORIGINAL ARTICLE**

# ''आमनेर किल्ल्याचा इतिहास''

**प्रा. राजेश हिरालाल घोडेस्वार**
इंदिरा गांधी कला—वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर, जि.नागपूर.

**प्रस्तावना :**

विदर्भातील अमरावती आणि नागपूर जिल्हयाच्या सरहद्दीवर वरदा (वर्धा) नदिच्या काठावर आमनेरचा किल्ला आहे. सम्राट अकबराच्या काळापासून वऱ्हाडच्या राजधानीचा मान लाभलेला गाविलगड, आकाराने अतिप्रचंड आणि महाराष्ट्रातला सगळयात मोठा पहाडी किल्ला म्हणून मिरविणारा नरनाळा यांनी वऱ्हाडचा इतिहास समृद्ध केलेला आहे. याच साखळीतला एक छोटेखानी आणि महत्त्वाचा किल्ला म्हणजे आमनेर किल्ला होय. काही विद्वान इतिहासकार, अभ्यासक आमनेर किल्ल्याला जलालखेडयाचा किल्ला म्हणूनही उल्लेख करतात. मराठा आणि ब्रिटिश कालखंडातील महत्त्वपुर्ण घडामोडिंचे महत्वाचे केंद्र असलेला व दुर्ग बांधणीच्या बहुतेक सर्वच अटिंची पुर्तता करणारा हा आमनेरचा किल्ला इतिहासाची साक्ष देत ताठ मानेने उभा आहे.

**विषय प्रवेश—**

मध्य प्रदेशातील मुलताई येथुन उगम पावणारी तापी नदी व चिखलदरा येथील सर्वोच्च शिखर असलेल्या वैराट येथुन उगम पावलेली व मेळघाटातील गगनभेदी पहाडातून वाहणारी गडगा या दोन नद्यांच्या त्रिभूज प्रदेशात आमनेरचा किल्ला वसलेला आहे. या किल्ल्याचा निर्माता कोण? याविषयी ऐतिहासिक पुरावे आढळत नाही. काही ठिकाणी गोंडराजांच्या राजवटीत हा किल्ला बांधल्याचे तर काही ठिकाणी मराठा कालखंडात हा किल्ला बांधल्याचे उल्लेख सापडतात. परंतू त्याला भक्कम असा आधार मिळत नाही. परंतू सम्राट अकबराच्या राज्यव्यवस्थेचे वर्णन करणाऱ्या 'आईने अकबरी' या ग्रंथात आमनेरचा उल्लेख आलेला आढळतो. त्या काळातील सरकार नरनाळे म्हणून नरनाळा किल्ल्याच्या अखत्यारीत असणाऱ्या चौतिस महालांच्या यादीत आमनेरचे महसुली उत्पन्न अठ्ठेचाळीस लाख दाम सांगितले आहे. म्हणजेच हा किल्ला मध्ययुगीन काळातील असावा या विधानाला ऐतिहासिक आधार आहे.

आजच्या नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यात एका उंच व टणक जागेवर हा किल्ला उभारण्यात आला. वर्धा, जाम व वसिष्ठा या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर आमनेरचा दुर्गराज असुन या किल्ल्याच्या परिसरात आमनेर, मुक्तापुर व जलालखेडा ही तीन गावे आहेत. एखादा समभुज त्रिकोण काढावा व त्याच्या शिरोबींदुवर एकएक गाव ठेवावे अशी या किल्ला क्षेत्राची भौगोलीक रचना आहे. आमनेरचे पूर्वीचे नाव उमदापूर होते, असे स्थानिक लोक सांगतात. गोंडकाळात हे गाव आमनेर म्हणून ओळखले जात असे. आमनेर येथील मशिदीवर प्रत्यक्ष

औरंगजेबाने कळस लावल्याचे सांगितले जाते. संपूर्ण आमनेर गावात मध्ययुगीन अवशेष सापडतात. नदीचे पात्र अतिशय विस्तीर्ण असून प्रस्तरांची रचना मोठी खुबीदार आहे.

आमनेरच्या किल्ल्याचा विस्तार अडिच ते तीन एकराच्या क्षेत्रफळात असुन या किल्ल्याचे संपूर्ण बांधकाम विटा आणि चुन्यात केलेले आहेत. किल्ल्याचे बुरुज, परकोट व आतील सर्व दालने यांचे बांधकाम आज भग्नावस्थेत असले तरीही हा किल्ला आपल्या गतवैभवाची शान राखून आहे. वर्धा नदिच्या काठाने नदीच्या वळणावरील खडकाळ भूपृष्ठावर आमनेरला किल्ला आहे. मध्ययुगीन कालखंडामध्ये असलेल्या वैशिष्टयपूर्ण किल्ल्यासारखा किल्ला येथे उभारण्याची एक महत्त्वाकांक्षी योजना असावी. या किल्ल्याची रचना अतिशय वैशिष्टयपूर्ण असून नदीच्या पात्रालगत असलेल्या वळणाचा उपयोग करुन खडकावर तिन्ही बाजुंनी उंची तट उभारण्यात आले. प्रवेशव्दाराकडे येणारे मार्ग हा खडक तासुन निर्माण करण्यात आला. प्रवेशव्दारालगत असलेलया बुरुजावरुन प्रवेश मार्ग तसेच नदीच्या पात्रातून होणारी वाहतूक तत्कालीन हैद्राबाद संस्थानातील लगतची स्थाने आणि वऱ्हाडाच्या बाजुने (मध्यप्रदेश) येणाऱ्या मार्गावर नियंत्रण ठेवणे हा किल्ला उभारणीमागील प्रमुख उद्देश असावा.

आमनेरच्या किल्ल्याला एकूण आठ बुरुज असून त्यापैकी सात शिल्लक आहे. एक बुरुज पाण्याच्या माऱ्याने भग्न झालेले दिसतो. बुरुजांची उंची जलपातळीपासुन सुमारे ५५ फुट इतकी असुन बुरुजाचा व्यास २०—२२ फुट असावा. काळया पाषाणात शिसे ओतून व लोखंडाच्या कांबीने तासलेले दगड जोडून बुरुजांचा पाया मजबुत केलेला दिसतो. म्हणूनच चारशे ते पाचशे वर्ष पुराच्या पाण्याचा प्रचंड माऱ्याला तोंड देत हे बुरुज आजही अविचल स्वरुपात अस्तित्वात आहे. बुरुजांच्या पायथ्याशी प्रचंड लोखंडी सळाखीचे बैल (जोड) दिसतात. नदीच्या काठकाठाने किल्ल्यास प्रदक्षिणा मारता येते. तिन्ही बाजुला पाणी व एका बाजुला खंदक अशी आमनेर किल्ल्याची रचना आहे. याच बुरुजांपैकी उत्तरेकडील बुरुजावरुन किल्ल्यावर पाणी नेण्याची व्यवस्था केली असावी असा अंदाज बांधता येतो. दगडाच्या पऱ्हाळी, जोड, उंचीवर चढणाऱ्या दगडाच्या खोलगट तुळया, उभय बाजुंनी असलेली सात इंच व्यासाची छिद्रे व त्यावरील झडपा स्पष्ट दिसतात. पुर्वेकडील बुरुजावरुन एक विहिर असुन तेथेही पाणी ओढण्याचा एक ओटा स्पष्ट दिसतो.

आमनेर किल्ल्याच्या बुरुजांतर्गत खोलगट असे पठार असुन दक्षिणेकडे श्री. सोमेश्वराचे अतिभव्य मंदिर असून ते शिवमंदिर आहे. या मंदिरात काही प्राचीन प्रतिमा दिसतात. मंदिराच्या वरच्या बाजुस सर्वत्र वास्तुंचे भग्नावशेष, भिंताडे, कमानी व तटबंदिच्या भग्नभिंती, बुरुजांचे निसटलेले व निखळलेले दगड दिसतात. समोरील भागात एक भव्य पण भग्न छतरहित वास्तु आहे. ती वास्तु अंबरखाण्याची असावी असे वाटते. किल्ल्याच्या पायथ्याशी पादुका, शिवलिंग, समाध्या, वृंदावने असे अनेक पुराणावशेष दिसुन येतात. या किल्ल्याच्या मधोमध उंच शिखरावर एक मंदिर असुन त्याला कठडे व पायऱ्यांची आयाताकार रचना आहे. मंदिरातील प्रतिमा शाक्तपंथीयांची कुलदैवत असलेली शक्तीप्रतिमा असावी. आमनेर किल्ल्याच्या पूर्वेस भव्य असे प्रवेशव्दार आहे. प्रवेशव्दारावर हिंदू शुभचिन्ह, विकासोन्मुख उमललेले कमळपुष्प स्पष्टपणे दिसतात. वरच्या बाजुला नगारा ठेवण्याची व्यवस्था असुन आतून जिने व चौक्या आहेत. पहारेकरी व व्दारपालास राहण्याची ती व्यवस्था असावी.

नागपूरचे राजे जानोजी भोसले यांनी पेशवे माधवराव व निजाम यांच्याशी राजकारण केल्याने ते दोघांनाही अप्रीय झाले. त्यामुळे जानोजीचा बंदोबस्त करण्याच्या उद्देशाने माधवरावाने जानोजीवर स्वारी काढली. पेशवे आपल्यावर चाल करुन येत असल्याचे कळताच जानोजीने आपल्या कुटुंबियांसह आमनेरच्या किल्ल्यात आश्रय घेतला. देवाजीपंत चोरघडेच्या सल्ल्याने जानोजीने पेशव्यांशी तह करुन प्रसंग निभावून नेला. पुढे जानोजीने पेशवे माधवराव विरोधात

रघुनाथरावाचा पक्ष उचलुन धरल्यामुळे माधवरावाने जानोजीवर दुसरी स्वारी काढली. पेशव्यांनी वरुड–जरुड या मार्गाने जाऊन भोसल्यांच्या ताब्यातील आमनेरचा भुईकोट किल्ला २० जानेवारी १७६९ रोजी जिंकून घेतला.

ब्रिटिश राजवटीत स्वातंत्र्य चळवळीचे रणशिंग फुंकणारे थोर स्वातंत्र्य सेनानी तात्या टोपे आपल्या दिल्ली प्रवासा दरम्यान माळवा प्रांतात भुमिगत असतांना काही काळ मेळघाटातल्या याच आमनेर किल्ल्यात वास्तव्यास होते.स्वातंत्र्याची चळवळ राबविणाऱ्या मंडळींनी गडकोट किल्ल्यांचा आश्रय घेवून आपल्या चळवळीला व्यापक स्वरुप देवू नये, या उद्देशाने अमरावती जिल्हयाचा तत्कालिन डेप्युटी कमिश्नर टी.एच.बुलक याने केलेल्या शिफारशीनुसार ९ जुन १८५८ रोजी ब्रिटिश सरकारने गाविलगड, नरनाळा व आमनेर हे तिन्ही किल्ले पाडून टाकण्याचा निर्णय घेतला. ११ एप्रिल १८५९ पर्यंत या किल्ल्यांचा हा तोडफोडिचा उद्योग सुरु होता. या विध्वंसक कार्यावर १३८२ रुपये तिन आणे खर्च झाल्याची नोंद ब्रिटिशी कागदपत्रात सापडते.असा हा विदर्भाचा भुषण ठरणारा आमनेरचा दुर्गराजइतिहासाचा मूक साक्षिदार आहे.

**निष्कर्ष –**

१. आमनेर येथील उपलब्ध झालेल्या अवशेषांवरुन हे स्थान अकबराच्या काळापासून राजकीय घडामोडींचे महत्वपूर्ण केंद्र होते. मोगल काळात हा किल्ला बांधला असावा, आणि आमनेर हीच मोगलांची वऱ्हाड प्रांताची राजधानी असावी.
२. नागपूरकर भोसल्यांच्या काळात गाविलगड किल्ल्याला उर्जितावस्था प्राप्त झाली. त्यामुळे आमनेरला दुय्यम महत्त्व मिळाल्याने भोसल्यांच्या राजवटीत आमनेरचे वैभव लुप्त होण्यास प्रारंभ झाला.
३. हैद्राबादचे राज्य आणि माळव्याचे (मध्यप्रदेश) राज्य हयांच्या अगदी मध्यभागी असल्याने या प्रदेशांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने आमनेर किल्ल्याचे स्थान अतिशय महत्वाचे असावे.
४. आमनेर किल्ला आपला ऐतिहासिक वारसा जपत असला तरीही पूरातत्व खात्याच्या उदासिनतेमुळे हा किल्ला शेवटच्या घटका मोजत आहे. शासनाने या किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व जाणून त्याच्या संवर्धनाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.
५. आमनेर किल्ल्याच्या परिसरात संशोधनाला चालना मिळाल्यास त्या स्थानाच्या इतिहासाचे अधिक पुरावे मिळण्यास बराच वाव आहे.

संदर्भ–

१. चितळे, श्रीपाद केशव – विदर्भातील किल्ले, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००५, पृ.१६
२. पाठक, डॉ. अरुणचंद्र –महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर नागपूर जिल्हा भाग–२, महाराष्ट्र शासन मुंबई २००५, पृ.२५३
३. टेंभेकर, डॉ. नलिनी– पुर्व विदर्भातील ऐतिहासिक व प्रेक्षणिय स्थळे, पिंपळापूरे बुक डिस्ट्रिब्युटर्स नागपूर प्रथमावृत्ती २०१०, पृ.१२१
४. प्रत्यक्ष पाहणी